महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.

## परिपत्रक क्र.कोविमं/माध्य. परीक्षा /२४७५ / दि .०७/१२/२०१८.

**विषय-** शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत व नव्याने मान्यता देण्यात आलेल्या संस्थांची यादी कळविण्याबाबत.. ..

**संदर्भ-१)** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ दि २४.११. २०१७
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,शासन निर्णय,क्र.संकीर्ण-८२१८/प्र.क्र.२९९/सां.का.४,दि. ०३ .११.२०१८
३) कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.डिओजे-२०१८/चार/१८९७ दिनांक ०६/११/२०१८

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुखांनां कळविण्यात येते की, शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबातच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने उपरोक्त संदर्भिय क्र.१ ने दि.२४.११.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. तसेच संदर्भिय क्र ०२ च्या शासन निर्णयान्वये मार्च २०१९ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (इ.१० वी ) वाढीव गुणांची सवलत देण्याकरीता शास्त्रीय गायन,वादन व नृत्य या क्षेत्रातील संस्था व लोककला प्रकारातील संस्था अशा सर्व संस्थांची यादी प्रमाणपत्र देण्याकरिता प्रसिध्द केली आहे.

२४ नोव्हेंबर २०१७ च्या संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून शास्त्रीय कला,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये अतिरिक्त गुणाची सवलत देण्यात येत आहे. **सोबत दोन्ही शासन निर्णय जोडलेले आहेत.त्यातील गुणांनुसार शिफारस पत्र शाळांनी पाठवायचे आहे.**

यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च २०१९ साठी व त्यापुढील परीक्षांसाठी सर्व मान्याताप्राप्त शाळांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करुन प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करावेत.

**विद्यार्थ्याने शाळेकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे**

| करावयाची कार्यवाही | अंतिम दिनांक |
|---|---|
| विद्यार्थ्याने शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | १५ डिसेंबर २०१८ |
| शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे. | १५ जानेवारी २०१९ |

सदर सवलत फक्त नियमित, खाजगी नियमित विद्यार्थ्यांना देण्यात यावी. पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांना लागू राहणार नाही.

२) कला सवलतीचे गुण संबंधित विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास उत्तीर्ण होण्यास जितके गुण कमी पडत असतील तितके गुण अनुज्ञेय असलेल्या गुणविभागणीप्रमाणे एक किंवा सर्व विषयात कमाल मर्यादित विभागून देण्यात येतील उर्वरित शिल्लक गुण संबंधित विद्यार्थ्यांच्या एकूण गुणामध्ये टक्केवारीमध्ये जमा करण्यात येतील.

२) उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेले गुण एकूण गुणांमध्ये स्वतंत्रपणे क्रीडा गुणांच्या प्रचलित पध्दतीनुसार दर्शविण्यात येतील.

३) कला सवलतीचे गुण दिल्यास गुणांची टक्केवारी सरासरी १०० टक्केपेक्षा जास्त होणार नाही.

४) कला सवलतीचे गुण कोणत्याही पारितोषिकासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.

५) मार्च २०१९ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज दिनांक १५ डिसेंबर २०१८ पर्यंत त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे साक्षांकित प्रमाणपत्रासह सोबत जोडलेल्या विहित परिशिष्टामध्ये सादर करावेत.

६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक ०३-११-२०१८ रोजीच्या शासननिर्णयातील संस्थांकडील संबंधित विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकानी प्रमाणित करुन दिनांक २४.११.२०१७ रोजीच्या शासननिर्णयामध्ये नमूद केलेल्या कलाप्रकाराच्या प्राविण्यानुसार अनुज्ञेय होणाऱ्या गुणांच्या शिफारशीसह संबंधित विभागीय मंडळाकडे शाळेच्या लेटरहेडवर प्रस्ताव सादर करावेत.

ज्या विद्यार्थ्यांना या प्रकारात गुण द्यावयाचे आहेत त्या विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे प्रमाणित करुन विद्यार्थ्यास किती गुण द्यावेत याची शिफारस करावी व
मान्यताप्राप्त संस्थांची यादी त्यासोबत सादर करावी. कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

७) एखादा विद्यार्थी क्रीडा ,शास्त्रीय कला,चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एकापेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करत असला तरी , **कोणत्याही एकाच क्षेत्रासाठीचे सवलतीचे अतिरिक्त** गुण घेण्यासाठी अर्ज करु शकतो.

८) **विद्यार्थी इलेमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही याची नोंद घ्यावी.दोन्ही परीक्षेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.**

९) **विद्यार्थ्याने शास्त्रीय कलेच्या नृत्य,गायन,वादन यामध्ये ३ परीक्षा अथवा ५ परीक्षा उत्तीर्ण असेल तर ती सर्व प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

## सर्व शाळाप्रमुखांनी खालील बाबीची नोंद घ्यावी.

नोंद:-सन २०१७ मध्ये कला संचालनालयाकडून आयोजित करण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजीएट परीक्षेचा निकाल माहे डिसेंबर २०१७ मध्ये घोषित करण्यात आलेला आहे. व संबंधित सर्व केंद्रांना पाठविण्यात आलेला आहे. तथापि प्रमाणपत्रांची छपाई अद्याप न झाल्याने वितरीत करता येत नसल्याचे कलासंचालनालयाने दि.०६ नोंव्हेंबर १८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

तरी मार्च-१९ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये विद्यार्थी सवलतीच्या गुणापासून वंचित राहू नये याकरीता एलिमेंटरी व इंटरमिजीएट परीक्षेच्या अनुषंगाने **संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालाची यादी प्रमाणित करुन पात्र विद्यार्थ्यांना, मख्याध्यापक/ केंद्रप्रमुख यांनी प्राप्त निकालावरुन या परिपत्रकासोबत प्रसिध्द केलेल्या सुधारीत परिशिष्ट ब प्रमाणित करुन प्रस्तावासोबत सादर करण्याची कार्यवाही करावयाची आहे.**

प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करताना या परिपत्रकासोबत सादर करण्यात आलेल्या
१) शाळेने शिफारस करावयाचा नमुना २) परिशिष्ट 'अ'
३) सुधारीत परिशिष्ट ' ब' ४) एलिमेंटरी व इंटरमिजीएट परीक्षेच्या निकालाची प्रमाणित प्रत ही प्रति विद्यार्थी निहाय प्रस्तावासोबत लावण्यात यावी (निकालाची एकच प्रमाणित प्रत लावण्यात येऊ नये.)

तरी उपरोक्त अ.क्र. १ ते ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणेच शाळांनी आपले प्रस्ताव विहीत केलेल्या मुदतीत सादर करावेत.

सोबत- १) दि २४.११. २०१७ रोजीचा शासन निर्णय ,
२) शाळेने विभागीय मंडळाकडे सवलतीच्या गुणांकरीता करावयाच्या शिफारस पत्राचा नमुना ,
३) परिशिष्ट 'अ'
४) सुधारीत परिशिष्ट ' ब'
५) शासनाने दि.०३/११/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या संस्थांची यादी.

प्रति,

मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा.

शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रिडा विभाग

**शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण - २०१६ / प्र.क्र. २०२ / एसडी-२**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- २४ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एचएससी - १०९७/(१४४४ /९७ ) /उमाशि-१, दिनांक: २६ जून,१९९७

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एचएससी - १७०७/(२२२ /०७)/उमाशि-१, दिनांक: २५ मार्च, २०१०

३) शासन शुध्दीपत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एचएससी - १७०७/(२२२ /०७)/उमाशि-१, दिनांक: ०९ जून, २०१०

४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसएससी - २०१२/(१५४ /१२)/उमाशि-२, दिनांक: २१ एप्रिल, २०१५

५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दिनांक: ०७ जानेवारी, २०१७

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दिनांक: १४ मार्च, २०१७

७) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दिनांक: २८ सप्टेंबर,२०१७

८) शासन निर्णय,पर्यटन व सांस्कतिक कार्य विभाग,क्र-संकीर्ण ८२१७/प्र.क्र.४१/सां.का.४ दिनांक २७ सप्टेंबर,२०१७

**प्रस्तावना:-**

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ अन्वये इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश देताना कला व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे २ व ३ टक्के जागा राखीव ठेवण्याबाबत शासनाने धोरण निश्चित केले आहे. संदर्भाधीन शासन निर्णय क्र.४ नुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) परीक्षेत प्रविष्ठ होणाऱ्या राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दतीबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

क्रीडा क्षेत्रासोबतच कला,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेचा उपयोग त्यांच्या भविष्याच्या प्रगतीपटासाठी होणे आवश्यक आहे. तसेच, लोककला हे समाज प्रबोधनाचे माध्यम आहे. लोककलेची वाढ व संवर्धन करण्याचे काम अनेक शालेय विद्यार्थी करीत असतात. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) परीक्षेमध्ये क्रीडा गुणांच्या धर्तीवर शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कार्यपध्दती संदर्भाधिन दि. ०७ जानेवारी, २०१७, दि.१४ मार्च, २०१७ व दि.२८ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. याबाबतची अंमलबजावणी सन २०१६-१७ पासून करण्यात आली आहे. तथापि, यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत निर्गमित करण्यात आलेले दि. ०७ जानेवारी, २०१७, दि. १४ मार्च, २०१७ व दि. २८ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णय या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहेत.

२. शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून शास्त्रीय कला,चित्रकला या क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) परीक्षेमध्ये पुढीलप्रमाणे अतिरिक्त गुणाची सवलत देण्यात येईल.

२.१) **शास्त्रीय कला :-**

२.१.१) शास्त्रीय नृत्य,गायन व वादन यामध्ये ज्या विद्यार्थ्याने मान्यताप्राप्त संस्थतेच्या सलग ३ परिक्षा अथवा ५ परिक्षा दिल्या असेल त्या विद्यार्थ्यांना त्याचे शासकीय नृत्य, गायन व वादन या कलेमधील गुण व यानुसार द्यावयाची ग्रेड यानुसार खालीलप्रमाणे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात यावे.

| गुण | ग्रेड | कमाल गुण | |
|---|---|---|---|
| | | ३ री परिक्षा | ५ वी परिक्षा |
| ७५% व त्यापेक्षा जास्त | A+ | १० | १५ |
| ६५% व त्यापेक्षा जास्त आणि ७५% पेक्षा कमी | A | | |
| ५५% व त्यापेक्षा जास्त आणि ६५% पेक्षा कमी | B+ | ०७ | १० |
| ४५% व त्यापेक्षा जास्त आणि ५५% पेक्षा कमी | B | ०५ | ०५ |
| ४५% पेक्षा कमी | C | ०३ | ०३ |

२.१.२) पाश्चात्य नृत्याकरिता सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येणार नाहीत.

२.१.३) शास्त्रीय कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल अशा संस्थांची सन २०१७-१८ करिताची यादी सांस्कृतीक कार्य विभागाने संदर्भाधिन दि.२७ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केली आहे. सदर संस्था खालील अटींची पूर्तता करतात.

अ. सदर संस्थेची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे झालेली असून नोंदणी करुन ५ वर्ष पेक्षा जास्त कालावधी झाला असावा.

ब. संस्थेकडे मागील ३ वर्षांचा लेखा अहवाल असावा.

सन २०१८-१९ पासून वरील प्रमाणे निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांना सांस्कृतिक कार्य विभागामार्फत मान्यता देण्यात यावी. सांस्कृतिक कार्य विभाग याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करून संस्था नोंदणी करणासाठी विहित कालावधी निश्चित करेल. सदर कालावधीत संस्थाना नोंदणी करणे आवश्यक राहील.

२.१.४) ज्या संस्थांची नोंदणी सांस्कृतिक कार्य विभागाकडे असेल, त्या संस्थेचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याने प्राप्त केलेले असल्यास विद्यार्थी ज्या शाळेत इ.१० वी शिकत आहे, त्या शाळेच्या मुख्यध्यापक/प्राचार्यांमार्फत ते तपासून प्रमाणित करण्यात येईल. विद्यार्थ्याने सांस्कृतिक कार्य विभाग

मान्यता प्राप्त संस्थानी आयोजित केलेल्या ३ री किंवा ५ वी परीक्षा विद्यार्थी इ. ७ वी, इ. ८ वी, इ. ९ वी अथवा इ. १० वी मध्ये असताना उत्तीर्ण केलेली असावी. तसेच विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षांप्रमाणे त्याला अतिरिक्त गुण देण्याची व त्याप्रमाणे राज्य मंडळास कळविण्याची जबाबदारी संबंधित शाळा मुख्याध्यापकांची राहील.

२.१.५) कला क्षेत्रातील कोणत्या प्रकारासाठी (शास्त्रीय गायन/नृत्य/वादन) अतिरिक्त गुण दिले आहेत ते राज्यमंडळाने संबधित विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेमध्ये नमूद करावे.

२.१.६) कला क्षेत्रातील ३ री व ५ वी परिक्षा एकाचवेळी देणारे विद्यार्थी सवलतीचे गुण देण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.

२.१.७) संबंधित संस्थांना विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देताना त्याची परिक्षानिहाय गुणपत्रिका देणे संस्थावर बंधनकारक राहील. विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये प्रस्ताव सादर करताना प्रमाणपत्रासोबत परिक्षानिहाय गुणपत्रिकाही सादर कराव्या.

२.२) **लोककला :-**

२.२.१) शासनाने लोककलांना अनुदान देण्याच्या योजनेतंर्गत अनुदान मंजूर करण्याचे निकष सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय दि.०१ जानेवारी, २००८ अन्वये जाहीर केले आहेत. प्रयोगात्मक लोककला प्रकारात किमान ५० प्रयोग सादर करणाऱ्या संस्थांना / मंडळाना सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

२.२.२) सांस्कृतिक कार्य विभाग याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करून संस्था नोंदणी करणासाठी विहित कालावधी निश्चित करेल. सदर कालावधीत संस्थाना नोंदणी करणे आवश्यक राहील.

२.२.३) सांस्कृतिक कार्य विभागाकडील नोंदणीकृत संस्था / मंडळाचे प्रमाणपत्र कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल. अशा संस्था / मंडळाची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे झालेली असणे आवश्यक आहे (धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीची अट सन २०१८-१९ पासून लागू करण्यात यावी).

२.२.४) अतिरिक्त गुण अनुज्ञेय असणाऱ्या प्रयोगात्मक लोककला प्रकारांची निश्चिती सांस्कृतिक कार्य विभागाने करावी.

२.२.५) इ.७ वी, इ.८वी, ९वी व इ.१० वी या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यास प्रयोगात्मक लोककला प्रकारातील सादरीकरणाबाबत खालील प्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात यावे.

| प्रयोगांची संख्या | अतिरिक्त गुण |
|---|---|
| २५ पेक्षा जास्त-५० पेक्षा कमी | ५ |
| ५० व त्यापेक्षा जास्त | १० |

लोककला सादरीकरणातील निर्मितीच्या कोणत्याही घटकामध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यास सदरप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात यावेत.

२.२.६) इ. ७ वी,इ.८वी, ९वी व इ.१० वी या शैक्षणिक वर्षात राज्य शासनातर्फे राज्यस्तरावर घेण्यात येणाऱ्या बालनाट्य स्पर्धेत वैयक्तिक प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात यावे.

| क्रमांक | अतिरिक्त गुण |
|---|---|
| प्रथम ( सुवर्ण पदक ) | १५ |
| व्दितीय ( रौप्य पदक ) | १० |
| तृतीय ( कांस्य पदक ) | ५ |

२.२.७) राज्य शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या बालनाट्य स्पर्धेत विभाग स्तरावर वैयक्तिक प्रथम क्रमांक ( सुवर्ण पदक) मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास ०५ अतिरिक्त गुण देण्यात येतील.

२.२.८) चित्रपटासाठी राष्ट्रीय स्तरावरील अभिनय पुरस्कार (वैयक्तिक) प्राप्त होणाऱ्या बाल कलाकारास १० अतिरिक्त गुण देण्यात यावे. तसेच चित्रपटासाठी राज्य स्तरावर प्रस्तुत पुरस्कार (वैयक्तिक) प्राप्त होणाऱ्या बाल कलाकारास ०५ अतिरिक्त गुण देण्यात येतील.

२.२.९) भविष्यात लोककला क्षेत्रात काम करणारे अभ्यासक,संस्था व मंडळ यांनी प्रयोगात्मक लोककला संदर्भातील अभ्यासक्रम तयार करावा. सदर अभ्यासक्रम तपासून व प्रमाणीकरण करण्याबाबतची यंत्रणा सांस्कृतिक कार्य विभागाने निश्चित करावी. तसेच याकरिता स्वतंत्र अभ्यास समिती स्थापन करण्यात यावी. सदर अभ्यासक्रमानूसार गुणदान योजना ठरवण्यात येईल.

२.३) चित्रकला :-

२.३.१) इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेतील ग्रेड A प्राप्त विद्यार्थ्यांना ७ गुण, ग्रेड B प्राप्त विद्यार्थ्यांना ५ गुण व ग्रेड C प्राप्त विद्यार्थ्यांना ३ गुण देण्यात यावे.

२.३.२) विद्यार्थी इलिंमेटरी परिक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परिक्षेचे गुण मिळणार नाही.

३. एखादा विद्यार्थी क्रीडा, शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एकापेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करत असला तरी, कोणत्याही एकाच क्षेत्रासाठीचे सवलतीचे अतिरिक्त गुण घेण्यासाठी अर्ज करु शकतो.

४. विद्यार्थ्यांना कला क्षेत्रासाठीचे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येत असल्याने, इयत्ता ११ वी प्रवेश देताना कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना २% जागा राखीव ठेवण्याची दि.२५ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये देण्यात येत असलेली सवलत रद्द करण्यात येत आहे.

५. इ १० वी चे निकाल विहित कालावधीत लावणे राज्यमंडळास शक्य व्हावे, यासाठी शाळांकडून सवलतीचे गुण देण्याबाबतचे प्रस्ताव विहित कालावधीत राज्यमंडळाकडे सादर होणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात येत आहे.

| करावयाची कार्यवाही | अंतिम दिनांक |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | १५ डिसेंबर |
| शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | १५ जानेवारी |

वरील वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधिताची राहील. संबंधित संस्थांनी वरिल वेळापत्रक विचारात घेवून परिक्षांचे आयोजन, निकाल व प्रमाणपत्र देणे इ. कामे पूर्ण करावी.

६. संबंधित संस्थेने विद्यार्थ्यांस मूळ प्रमाणपत्र संस्थेच्या सही शिक्या सह २ प्रती मध्ये दयावे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांस पोच दयावी. विद्यार्थ्यांने प्रमाणपत्राची एक प्रत शाळेत मुख्याध्यापकाकडे जमा करुन पोच घेऊन संस्थेत पोच जमा करावी. संस्थेने विद्यार्थ्यांस सोबतच्या परिशिष्ट-"अ" मध्ये दिलेल्या नमुन्यामध्येच प्रमाणपत्र दयावे. चित्रकलेबाबतचे प्रमाणपत्र सोबतच्या परिशिष्ट-"ब" मध्ये दिलेल्या नमून्यामध्ये विद्यार्थ्यांस दयावे.

७. इ.१० च्या नियमित परिक्षेसाठी प्रविष्ठ होणारा कोणताही विद्यार्थी ( फॉर्म १७ सहित ) या सवलतीच्या अतिरिक्त गुणासाठी पात्र राहील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२४१३२११८८७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.11.24 13:24:03 +05'30'

( डॉ.सुवर्णा सि.खरात )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव,राजभवन,मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
३) मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग),मंत्रालय,मुंबई.
४) मा. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) क्रीडा संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) कला संचालक, कला संचालनालय,मुंबई
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे.
११) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ (सर्व).
१२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१३) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१४) सर्व शिक्षण निरीक्षक, मुंबई (पूर्व ,पश्चिम, उत्तर)
१५) निवड नस्ती (एसडी - २)

२५

शास्त्रीय कला ,चित्रकला/लोककला प्रकारात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुणांची सवलत देणेबाबत मुख्याध्यापकांनी विभागीय मंडळाकडे शिफारस करावयाच्या पत्राचा **नमुना**

दिनांक :-
जा.क्र.

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ ,
कोल्हापूर वि.मंडळ ,कोल्हापूर.

विषय :- कला विषयातील सवलतीचे वाढीव गुण देणेबाबत.

महोदय,

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या शाळेतील/विद्यालयातील खालील विद्यार्थी मार्च २०१८ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होत आहेत.त्यांनी खालील कला प्रकारात /परीक्षेत प्राविण्य मिळविलेले आहे.

| क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | माध्यमिक शालांत प्र.परीक्षा बै.क्रमांक | **कला प्रकार** शास्त्रीय गायन,वादन,नृत्य ,चित्रकला व लोककला | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त श्रेणी/ प्राविण्य. | शासन निर्णयानुसार प्राप्त श्रेणीनुसार अतिरिक्त द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी च्या प्राप्त प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पाहिलेली आहे .त्यानुसार उपरोक्त तपशीलाप्रमाणे अतिरिक्त गुण देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्याध्यापक स्वाक्षरी
नांव :-
शाळेचा शिक्का :

## "परिशिष्ट अ -"

संस्थेचे नाव ------------------------------------------------------------------------------------------ -:

पत्ता ------------------------------------------------------------------------------------------------ - :

सांस्कृतिक कार्य विभाग नोंदणी क्रमांक ------------------- दिनांक --------------------

## प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी ------------------------------ हा /ही (शास्त्रीय कला प्रकारचे नाव) ------------------------------------------ या कला प्रकारातील ------------------------परिक्षा --------गुणांसह (श्रेणी-------) उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होताना तो/ती ---------इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता / होती.

ब) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ------------------------------------ हा / ही मागील ------------ वर्षातील ---------------------- या लोककला प्रकारात एकूण ------------प्रयोगात सहभागी झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च ---------- मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी ) परिक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

अध्यक्ष / सचिव
संबंधित संस्थेचे नाव
(रबरी शिक्क्यासह)

टिप -"अ" किंवा "ब" यापैकी लागू नसेल ते खोडावे.

## सुधारीत परिशिष्ट-ब

दिनांक-------------------------

# प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी---------------------------- हा /ही इंटरमिजीट ड्राईंग ग्रेड परिक्षा सन ------------मध्ये----------श्रेणीने उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परीक्षा उत्तीर्ण होताना तो/ ती----------------- इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता/होती.

आ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी------------------------------------------हा / ही इलिमेंटरी ड्राईंग ग्रेड परीक्षा सन ------------ मध्ये उत्तीर्ण झाला/ झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च --------------- मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ:-

दिनांक:-

**मुख्याध्यापक/केंद्र प्रमुख**
**संबंधित शाळेचे/ केंद्राचे नाव**
**(रबरी शिक्क्यासह)**

न.रा.मा. व उ.मा. शिक्षण मंडळ
पुणे-४११ ००४
सह सचिव
सहा. सचिव
12 NOV 2018
अध्यक्ष
सचिव
आवक क्रमांक :- 3687
शाखा :-

**शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याकरिता निवड करण्यात आलेल्या संस्थांना मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२१८/प्र.क्र.२९९/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०१८

**वाचा :-** १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एचएससी-१७०७/(२२२/०७)/ उमाशि-१, दिनांक २५ मार्च, २०१०
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी २, दिनांक ७ जानेवारी, २०१७

**प्रस्तावना :-**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या उपर्निर्दिष्ट दिनांक ७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेत वाढीव गुण देण्याची नवीन कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून शास्त्रीय कला क्षेत्र तसेच लोककला क्षेत्रात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याकरिता विहित निकष पूर्ण करणा-या संस्थांना दरवर्षी मान्यता या विभागामार्फत देण्यात येते.

२. सन २०१९ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेत वाढीव गुण देण्याकरिता संस्थांची निवड करण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी छाननी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सन २०१८-१९ करीता पात्र ठरणा-या संस्थांच्या नावांची शिफारस करतानाच ज्या संस्था सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या सलग तिन्ही शैक्षणिक वर्षाकरिता पात्र ठरविण्यात आल्या आहेत अशा संस्थांना पुढील ३ वर्षासाठी पुनश्चः नोंदणी करण्याची आवश्यकता नाही अशी शिफारस छाननी समितीने केली. सदर शिफारशीनुसार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शास्त्रीय कला गायन, वादन व नृत्य क्षेत्रातील संस्था तसेच लोककला क्षेत्रातील संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये मार्च, २०१९ पासून होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (इयत्ता १० वी) विद्यार्थ्यांना वाढीव गुणांची सवलत देण्याकरीता शास्त्रीय संगीत, नृत्य व वादन तसेच लोककला क्षेत्रातील खालील संस्थांची प्रमाणपत्र देण्याकरीता निवड करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १८. | आलाप बहुउद्देशीय सांस्कृतिक व सामाजिक संस्था | १/२१, नवीन सुभेदार ले-आऊट, नागपूर - २४ |
| १९. | महाराष्ट्र संगीत अध्यापक महामंडळ | प्रांतीक कार्यालय, खामगांव, गोपाळकृष्ण केला नगर, सिव्हील लाईन खामगांव, ता. खामगांव, जि. बुलढाणा |
| २०. | कलाश्री बहुउद्देशीय सेवाभावी अकादमी | सन्मती २६-बी, आदित्यनगर, उल्का नगरी, औरंगाबाद - ४३१ ००५ |
| २१. | नालंदा डान्स रिसर्च सेंटर | प्लॉट ए-७/१, एन. एस. रोड नं. १०, जे. व्ही. पी. डी. स्कीम, विलेपार्ले (प), मुंबई -४०० ०४९ |
| २२. | पवार तबला अकादमी | १५७०, कानडे मारुती लेन, पवार तबला अकादमी, नाशिक - ४२२ ००१ |
| २३. | नादब्रम्ह संगीत शिक्षण संस्था | कालिका नगर, माजलगांव, ता. माजलगांव,जि बीड ४३१ १३१ |
| २४. | आर्ट सोसायटी | कोणार्क गार्डन, ई-७, बिबवेवाडी गांव, पुणे - ४११ ०३७ |
| २५. | कनकलता प्रतिष्ठान | २, प्रकाशदीप अपार्टमेंट, बापा सिताराम मार्ग, हिरावाडी रोड, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३ |
| २६. | कै. कडू पाटील सेवाभावी चॅरिटेबल संस्था | कृष्णापूर, बिडकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद |
| २७. | नृत्यालिका | ई-३/४, अपना घर सोसायटी, पंप हाऊस, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६० |
| २८. | जय शिव बहुउद्देशीय शिक्षण मंडळ | द्वारा - विद्यावर्धिनी विद्यालय, मिरकले नगर, अहमदपूर, जि. लातूर - ४१३ ५१५ |
| २९. | श्री संत सदगुरु तुकाराम महाराज प्रतिष्ठान | शिरस मार्ग, ता. गेवराई, जि. बीड |
| ३०. | श्री संत एकनाथ शिक्षण प्रसारक मंडळ | मु. पो. जायकवाडी (उत्तर) ता. पैठण, जि. औरंगाबाद |
| ३१. | भारतीय संगीत समिती | अ/१५, आनंद बिल्डिंग, एस. व्ही. रोड, मालाड (प), मुंबई - ४०० ०६४ |
| ३२. | गरवारे कम्युनिटी सेंटर | एन-७, बी-१, सिडको पोलीस स्टेशन समोर, सिडको, औरंगाबाद - ४३१ ००३ |
| ३३. | कलानंद कथाक नृत्य संस्था | २, मातृप्रेम, घारपुरे घाट, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२ |
| ३४. | नागरी सांस्कृतिक व बहुउद्देशीय संस्था | रामनगर वार्ड नं. १, गोंदिया |
| ३५. | व्हायोलीन अकादमी | ११२, उमाशंकर, सहकार नगर-२, तुळशीबागवाले कॉलनी, पुणे - ०९ |
| ३६. | नृत्यांजली नृत्य संस्था | शिल्प ४७५/१४, सदरबझार, डॉ. तावडे हॉस्पिटलसमोर, सातारा |

| | | |
|---|---|---|
| ५६. | गुरु संगीत महाविद्यालय ट्रस्ट | १/३०३, ए विंग, कारगिल विजय, स्टेला, वसई रोड (प), ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२ |
| ५७. | ओंकार संगीत विद्यालय व बहुउद्देशीय संस्था | धामणगाव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद |
| ५८. | सांस्कृतिक निकेतन | विवेकानंद एज्युकेशन सोसा., पहिला मजला, ट्रस्ट ऑफिस, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ |
| ५९. | ज्ञानज्योती शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था | गट क्र. २२, किरकटवाडी (कोल्हेवाडी), पुणे २४ |
| ६०. | स्वर साधना संगीत विद्यालय | ७०/२, बी/१, कैलास हाईटस, दत्तनगर किवळे, देहूरोड, पुणे ४१२ १०१ |
| ६१. | गुरुवर्य पं. शंकरराव वैरागकर सार्वजनिक संगीत सेवा मंडळ | फ्लॅट नं. १०, रामचंद्र कृपा सोसायटी गणेश नगर, सैलानी बाबा स्टॉप जवळ, जेल रोड, नाशिक रोड, ता.जि. नाशिक ४२२ १०१ |
| ६२. | देवगंधर्व संगीत महाविद्यालय | गणेश पार्क, दुसरा मजला, सर्वे नं.९३, मु. पो. लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक ४२२ ३०६ |

## लोककला प्रकारातील संस्था

## तक्ता - ब

| अ.क्र. | संस्थेचे नांव | पत्ता | लोककलेचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | महाराष्ट्र शाहिर परिषद | १५०७, सदाशिव पेठ, लक्ष्मी प्लाझा, तळमजला, पुणे ४११ ०३०. | शाहिरी |
| २. | शाहिर हिंगे लोककला प्रबोधिनी | २७३, कसबा पेठ, माणिक चौक, पुणे ४११ ०११ | |
| ३. | शिवदर्शन सांस्कृतिक शाहिरी संच | प्लॉट नं. १११, भारतनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद | |
| ४. | ओम श्री संत सेना भारतीय कला मंदिर | सुभम ११५, जिजामाता नगर, वॉर्ड नं.१४, बुलढाणा, ता.जि. बुलढाणा ४४३ ००१ | |
| ५. | राष्ट्रीय एकता साहित्य, कला, शिक्षण प्रसारक मंडळ | डिग्रसवाणी, अकोला बायपास, अंतुले नगर जवळ, हिंगोली - ४३१ ५१३ | |
| ६. | तांबेश्वरी शाहिरी कलापथक | मु. पो. तांबवा, ता. केज, जि. बीड | |
| ७. | साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहुउद्देशीय मंडळ | श्री कानोबा चौक, पातुर (नानासाहेब) ता. पातुर, जि. अकोला ४४४ ५०१ | |
| ८. | सुर्यप्रकाश बहुउद्देशीय सेवा संस्था | मु. पो. खरवड, ता. कळमनुरी, जि. हिंगोली ४३१ ७०२ | |

| | | |
|---|---|---|
| २४. | सुपुष्पमंगल बहुउद्देशीय संस्था | मु. येरगांव, पो. भेजगांव, ता. मुल, जि. चंद्रपूर |
| २५. | मानव सेवा प्रतिष्ठान | मु. पो. मोहोज खुर्द, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर |
| २६. | श्री. अष्टविनायक शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ | २४, युनिटी चेंबर, गणेश कॉलनी रोड, जळगांव |
| २७. | व-हाड शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था | मु. लोणी, पो. रिधोरा, ता. बाळापूर, जि. अकोला |
| २८. | तन्मय ग्रूप | द्वारा नाथा चितळे, २० आरतीया कॉम्पलेक्स, लोहार गल्ली, गणेश टॉकीज रोड, नांदेड ४३१ ६०४ |
| २९. | मंगल थिएटर्स | ९ ब/1 गुरुवार पेठ, पुणे |
| ३०. | स्वप्नील - सपना लोककला विकास मंडळ | मानेगांव, ता. माढा, जि. सोलापूर ४१३ ४१० |
| ३१. | कै. सोपानराव तादलापुरकर क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा | कुंचेली, ता. नायगांव (खे.) जि. नांदेड |

२. **या शासन निर्णयान्वये उपरोक्त तक्ता अ व ब मध्ये निवड करण्यात आलेल्या नोंदणीकृत संस्था सन २०१९ मध्ये होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस (इयत्ता १० वी) बसणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यास पात्र आहेत.**

३. तसेच, **खालील नोंदणीकृत संस्थांना सन २०१९ पासून पुढील ३ वर्षात होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस (इयत्ता १० वी) बसणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.**

## शास्त्रीय गायन, वादन, नृत्य व लोककला या क्षेत्रातील संस्था

## तक्ता -क

| अ.क्र. | संस्थेचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १. | भारतीय संगीत प्रसारक मंडळाचे गंधर्व महाविद्यालय | ४९५, शनिवार पेठ,मेहूणपुरा, पुणे |
| २. | भारती विद्यापीठ | भारती विद्यापीठ भवन, लालबहादूर शास्त्री मार्ग, पुणे ४११ ०३० |

| | | |
|---|---|---|
| **भारुड, पोवाडा व गोंधळ लोककला प्रकारातील पात्र संस्थांची यादी** | | |
| १. | लोककला व कलावंत उत्कर्ष मंडळ | मु. कोल्हे वस्ती, पो. येसगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर |
| **इतर लोककला प्रकारातील पात्र संस्थांची यादी** | | |
| १. | बालगंधर्व सांस्कृतिक, कला, क्रीडा व युवक मंडळ | श्री. बालनाथ रामराव देशपांडे, देशपांडे गल्ली, क्रांती चौक, परभणी ४३१ ४०१ |
| २. | राजीव गांधी युवा फोरम | डी–१४०, परिपूर्ती एकता कॉलनी, गांधी विद्यालय जवळ, वसमत रोड, ता.जि. परभणी |
| ३. | नाटय संस्कार कला अकादमी | २०५, शुक्रवार पेठ, पाटसकर मार्ग, काळया हौदाजवळ, पुणे ४११ ००२ |
| ४. | व-हाड शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था | मु. लोणी, पो. रिधोरा, ता. बाळापूर, जि. अकोला |
| ५. | मंगल थिएटर्स | ९ ब/१ गुरुवार पेठ, पुणे |

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८११०५१५१८३४७१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2018.11.05 15:22:31 +05'30'

**(विलास रा. थोरात)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य व शालेय शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मुंबई
२. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे
६. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
७. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
८. महासंचालक, महाराष्ट्र राज्य, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
९. विभागीय अध्यक्ष / सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य (सर्व)